अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

# भाजपाला टिकाऊ व्हायचे की विकाऊ

निवडणुका आल्या की आयाराम गयारामची भाऊगर्दी होते. काही पक्षांमध्ये तर अगदी योजनापूर्वक पक्षांतरासाठी प्रयत्न केले जातात. परंतु यंदाच्या लोकसभा निवडणुकीपूर्वी पक्षबदलूंची जी काही घाईगर्दी उडालेली आहे. ती पाहिल्यावर राजकारणाचे कसे व्यापारीकरण झाले आहे हे सिध्द होते. ज्या पक्षाची चलती आहे. त्या पक्षामध्ये प्रवेश करून आपली दुकानदारी कशी चालू राहील असा प्रयत्न केलेला दिसून येतो. महाराष्ट्रात भाजपामध्ये काही जणांनी प्रवेश करावा असे जाणूनबुजून प्रयत्न झाले. त्यामागे भाजपाविषयी खूप सहानुभूती आहे असे समजण्याचे कारण नाही. फक्त वारा त्या दिशेने वाहत असल्यामुळे योजनापूर्वक डावपेच आखून काही ठराविक लोक भाजपात येताना दिसतात. विशेषत: राष्ट्रवादी काँग्रेसमधले काही नेते भाजपात आणले जात आहेत. ज्याप्रमाणे भिवंडीमधून कपिल पाटील तर नंदुरबारमधून हिना गावित यांना भाजपात प्रवेश दिला गेला. नुसताच प्रवेश दिला गेलेला नाही तर या पक्षबदलूंना ताबडतोब त्या मतदारसंघातून तिकिटेही दिली गेलेली आहेत. नव्या लोकांना पक्षात घेतल्यामुळे भाजपाच्या लोकसभा निवडणुकीत फार मोठा फायदा होईल, असे आज अजिबात चित्र नाही. मात्र विधानसभा निवडणुकीत त्याचा नक्कीच उपयोग होऊ शकतो. प्रश्न फक्त एवढाच आहे की, त्या त्या ठिकाणच्या जुन्या जाणत्या कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना डावलून या नव्या मंडळींना तिकिट दिल्यामुळे नाराजी निर्माण होण्याची शक्यता आहे. आम्हाला तर थोडीशी वेगळीच शंका येते. कारण इतर कोणत्याही पक्षाच्या लोकांपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेसचे लोक भाजपामध्ये येण्यासाठी एवढे उत्सुक का आहेत. कदाचित यामागे राष्ट्रवादी काँग्रेसचाच डाव असू शकतो. कारण आपली माणसे भाजपामध्ये पेरून ठेवायची आणि योग्य वेळी ती परत मिळवायची. असे राष्ट्रवादीचे आतापर्यंतचे धोरण आहे. मूळचे काँग्रेस किंवा राष्ट्रवादीचे हे नेते कायम भाजपामध्ये कधीच राहू शकत नाहीत. आपली त्या त्या ठिकाणची मक्तेदारी कायम ठेवण्यासाठी त्यांचे हे डावपेच चाललेले असतात आणि ते यशस्वीही होतात. नव्याने येणाऱ्या या नेत्यांमुळे भाजपाचा खरोखर किती राजकीय फायदा होईल हे आताच सांगता येत नाही.

## राष्ट्रवादीची मोर्चेबांधणी

यापूर्वी सातारा सांगलीमधूनही राष्ट्रवादीचे काही नेते भाजपामध्ये दाखल झाले होते. भाजपाला असे वाटले की, आपण काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेसला फार मोठे खिंडार पाडले. पश्चिम महाराष्ट्रामध्ये आपली फार मोठी ताकद वाढली. आता देखील सांगलीमधून संजयकाका पाटील यांना उमेदवारी दिल्याने गेली वीस वर्षे भाजपाबरोबर असलेले संभाजी पवार नाराज झाले आहेत. हीच परिस्थिती भिवंडी, नंदुरबार या ठिकाणी सुध्दा असू शकते. राष्ट्रवादी काँग्रेसचे विजयकुमार गावित यांच्या मुलीला थेट लोकसभेचे तिकिट देऊन भाजपाने आपला संधीसाधूपणाच दाखवला. राजकारणात संधीसाधूपणा करावाच लागतो. हे जरी खरे असले तरी भाजपाचे दुर्दैव असे आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस किंवा काँग्रेसच्या नेत्यांच्या जोरावर उड्या मारणे या पक्षाला लाभदायक ठरत नाही. कारण या दोन्ही पक्षांतून आलेले नेते आणि कार्यकर्ते पुन्हा वाऱ्याची दिशा बदलली की भाजपाकडे पाठ फिरवतात आणि पुन्हा आपल्या ओरिजनल पक्षात सामील होतात. त्यामुळे नंदुरबारमध्ये आज जरी हिना गावित यांना उमेदवारी दिली असली तरी स्थानिक पातळीवर भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक ताकद वाढण्याची कोणतीच शक्यता दिसत नाही. कारण नंदुरबारमधून आतापर्यंत दहा वेळा निवडून आलेले काँग्रेसचे माणिकराव गावित यांना इतक्या सहजासहजी पराभूत करता येणार नाही. फक्त या निमित्ताने भाजपाच्या हिना गावित, माणिकराव गावित यांची मते खातील. एवढाच मर्यादित लाभ भाजपाचा होऊ शकेल. यातला राष्ट्रवादीचा डाव समजून घेतला पाहिजे. कारण आपली माणसे तिथे पेरायची आणि मतदारसंघाची बांधणी करायची लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने भिवंडीत काय किंवा नंदुरबारमध्ये काय, त्या त्या नेत्यांची लोकप्रियता वाढवली जाईल. राष्ट्रवादीचे मतदार संघ तसेच शाबूत ठेवले जातील. कारण मत देणारा मतदार भाजपाला मत देत नाही. तर तो तिथल्या व्यक्तीला मत देतो. सांगलीत संजयकाका किंवा नंदुरबारमध्ये हिना गावित यांच्या नावावर मते मिळणार आहेत. त्यातून भाजपाची कोणतीच प्रतिष्ठा वाढत नाही. उलट अशा ऐनवेळी येऊन लोणी खाणाऱ्यांना तिकिट दिल्यामुळे भाजपाविषयी लोकांमध्ये अविश्वासच निर्माण होतो. भाजपाला सत्तेची घाई झाल्यामुळे तो अशा प्रकारचा राजकीय व्यापारीपणा करीत आहे. नंदुरबारजवळच्या शहादा दोंडाईचे मतदार संघातही गेली पन्नास वर्षे काँग्रेसमध्ये असलेल्या राऊळ कुटुंबाच्या मक्तेदारीला भाजपा शरण गेला. तिथून निवडून आलेले आमदार राऊळ यांचा सगळा कारभार आणि व्यवहार हा काँग्रेस स्टाईलचा असतो. गावात त्यांच्याच मालकीच्या कारखान्यात काम करणाऱ्याला पुरेसा पगारही दिला जात नाही. अशा सगळ्या अन्यायाचे समर्थक असलेल्यांना भाजपाकडून सन्मान दिला जातो आणि इथेच भाजपा मार खातो.

## दुकान फार चालणार नाही

या सगळ्या पार्श्वभूमीचा विचार केला तर भाजपाला फक्त सत्ता हवी आहे. आपल्या पक्षाची कायमस्वरूपी संघटनात्मक बांधणी करण्याची या पक्षाला अजिबात इच्छा दिसत नाही. या व्यापारीपणामुळे भाजपाचे दुकान फार काळ चालत नाही. वीस-पंचवीस वर्षांतून कुठेतरी एकदा सत्ता मिळते आणि पुन्हा हा पक्ष बाजूला फेकला जातो. विशेष म्हणजे शेजारच्या गुजरात राज्यातसुध्दा मोदी यांनी काँग्रेसवाल्यांना थारा दिलेला नाही. उलट आपल्या पक्षाच्या नेत्यांना संधी देण्याचे धोरण म्हणून तिथे सलग तीन वेळा मोदी यांना विजय मिळवता आला. निदान या आयाराम गयारामचा विचार करण्यापूर्वी स्थानिक नेत्यांना विश्वासात घेतले जायला हवे होते. त्यांना विश्वासात घेतले जाणे तर सोडाच, परंतु त्यांची साधी विचारपूसही केली जात नाही. मनी आणि मसल पॉवरवाल्यांची भाजपामध्ये हळूहळू गर्दी होऊ लागली आहे. अशा संधीसाधू आयाराम गयाराममुळे भाजपाची ताकद वाढणार नाही. फक्त या पक्षाला सूज आलेली दिसेल. ती सूज केव्हाही उतरू शकते आणि बंडखोरीची रोगराई पसरवू शकते. सत्तेच्या या मायाबाजारात तत्त्व आणि सिध्दांत जसे लिलावात काढले जातात हेच भाजपाने दाखवून दिले आहे. भाजपाला टिकावू पक्ष व्हायचे आहे की, विकाऊ व्हायचे आहे हे त्यांनी ठरवायचे आहे.